दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शनिवार दि.१ नोव्हेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक ७१ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Saturday 1 Noc 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 71 • Pages 4 • Rate 4 Rs

### राजकारणात नव्या वादळाची चाहूल

**मुंबई**-शेवटी राज ठाकरे यांनी मनसे कार्यकर्त्यांना इशारा देत आवाहन केले की, आगामी काळात मराठी माणसाच्या अस्मितेवर कुणी डल्ला मारला, तर आपण गप्प बसणार नाही. ईव्हीएमच्या घोटाळ्याविरुद्ध आवाज उठवणं असो की शिवरायांच्या गडांवरील अन्यायकारक निर्णयांविरोधात लढा देणं असो, मनसे रस्त्यावर उतरेल. सत्ता ही लोकांनी द्यायची असते, आणि तीच सत्ता जर मशीनमधून मिळवली जात असेल, तर ती लोकशाही नाही. त्यांच्या या भाषणाने मनसेचा मेळावा संपला, पण राजकारणात नव्या वादळाची चाहूल मात्र लागली आहे. राज ठाकरेंच्या या तीव्र भाषणानंतर आता सत्ताधाऱ्यांची प्रतिक्रिया काय येते, याकडे महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे.

# फलटण डॉक्टर आत्महत्या प्रकरणी एसआयटी स्थापन

## महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वात होणार तपास

## निष्पक्ष चौकशीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा निर्णय

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणाचा तपास आता विशेष तपास पथकामार्फत करण्यात येणार आहे. या प्रकरणाचे गांभीर्य आणि संवेदनशीलता लक्षात घेऊन, राज्याचे पोलिस महासंचालक यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने एसआयटी स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्देशानुसार, हा संपूर्ण तपास एका महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालील विशेष तपास पथकाकडून केला जाईल, जेणेकरून प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी व्हावी.फलटणमधील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या या महिला डॉक्टरने काही दिवसांपूर्वी आत्महत्या केली होती. या घटनेनंतर मोठी खळबळ उडाली आहे. तिने हातावर सुसाईड नोट लिहून ठेवल्याचे समोर आले होते. या चिठ्ठीमध्ये तिने आपल्यावर वरिष्ठांचा आणि पोलिसांचा दबाव असल्याची तक्रार नमूद केली होती. या प्रकरणात भाजपचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या दोन स्वीय सहायकांसह पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत.आत्महत्येपूर्वी केलेल्या तक्रारींमध्ये अत्यंत धक्कादायक आणि गंभीर बाबी उघड झाल्या आहेत. महिला डॉक्टरने पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने याच्यावर चार वेळा बलात्कार केल्याचा गंभीर आरोप केला आहे. याव्यतिरिक्त, मृतदेहाचा पोस्टमॉर्टम रिपोर्ट बदलण्यासाठी आपल्यावर रुग्णालयातील वरिष्ठांकडून तसेच पोलिसांकडून दबाव आणला जात असल्याची तक्रारही तिने नोंदवली होती. या सर्व गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर, प्रकरणाचा सखोल तपास आणि पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी हा तपास आता एसआयटीकडे सोपवण्यात आला आहे.

या प्रकरणामध्ये अनेक महत्त्वाच्या आणि मोठ्या नावांचा समावेश असल्याने, विरोधकांनी सातत्याने या आत्महत्येच्या घटनेची एसआयटी चौकशी करण्याची मागणी लावून धरली होती. स्थानिक सातारा पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास झाल्यास त्यांच्यावर राजकीय दबाव येण्याची शक्यता असल्याने, निष्पक्ष तपासासाठी विशेष तपास पथक नेमणे आवश्यक आहे, असा विरोधकांचा युक्तिवाद होता. अखेर, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन आणि विरोधकांची ही मागणी मान्य करत, मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाचा तपास एसआयटीकडे सोपवण्याचे निर्देश दिले आहेत.



# आसरडोह जिल्हा परिषद गटातून प्रा.ईश्वर मुंडे यांना उमेदवारी द्यावी-धारूर तालुक्यातील जनतेची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगर पालिका निवडणुकांचे पडझड वाजू लागले आहेत.निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सर्व पक्ष आपापल्या पक्षांचे मेळावे घेत आहेत.माजलगाव मतदार संघातील धारूर तालुक्यात आ.प्रकाशदादा सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी(अजीतदादा पवार) धारूर तालुक्याचा भव्य मेळावा नगरेश्वर मंदीर,धारूर येथे दि.३१ ऑक्टोबर २०२५ शुक्रवार रोजी संपन्न झाला.

या मेळाव्यात आ.प्रकाशदादा सोळंके,जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण,जेष्ठ नेते रमेशराव आडसकर, राजाभाऊ मुंडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून जिल्हा परिषद,पंचायत समिती व नगर पालिका निवडणुक जिंकण्याचा निर्धार केला.या वेळी जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगर पालिका इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागवण्यात आले.आसरडोह जिल्हा परिषद गट ओबीसी(सर्व साधारण) आरक्षित असून या गटातून प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांना उमेदवारी देण्यात यावी अशी जोरदार मागणी करण्यात आली.

प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांचे गांजपूर हे गाव आसरडोह गटात असून प्रा.ईश्वर मुंडे यांचे शैक्षणिक,सामाजिक व राजकीय कार्य उल्लेखनीय आहे.जिल्हा परिषद बीड अंतर्गत शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी पदावर वीस वर्षे नौकरी करून मागील दहा वर्षांपासून सक्रीय सामाजिक व राजकीय कार्य करत असलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांचा शिक्षक,विद्यार्थी,पालकवर्ग, सुशिक्षित युवकवर्ग व तळागाळातील जनतेशी प्रत्यक्ष जन संपर्क झालेला असून अनाथ-निराधार व गरजवंतांना मदतीचा




हात पुढे करून आर्थिक मदतीसह मनोधैर्य वाढण्याचे कार्य प्रा.ईश्वर मुंडे करत आहेत. सांप्रदायिक अंग असलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांचा धार्मिक क्षेत्रात किर्तन,भजनाच्या माध्यमातूनही खूप जन संपर्क वाढलेला आहे.एक उच्च शिक्षित,अभ्यासू,सुसंस्कृत,सर्व समावेशक व सर्वांना सहज उपलब्ध होणारे व्यक्तीमत्व म्हणून प्रा.ईश्वर मुंडे सर्व परिचित आहेत.म्हणून आसरडोह गटातून प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनाच राष्ट्रवादी काँग्रेस (अजीतदादा पवार)पक्षा कडून उमेदवारी द्यावी अशी मागणी आ.प्रकाशदादा सोळंके,रमेशराव आडसकर,ड.राजेश्वर चव्हाण यांच्याकडे तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.निवेदनावर बाबुराव काचगुंडे,भगवानराव पाटोळे,अंगद डापकर,विठ्ठल सिरसट,विजयकुमार मुंडे,कस्तुराबाई पवार,अशोक डापकर,अर्जुन लांब,अनंत हंगे,पंडित साखरे,मोहन समुद्रे,देविदास गांधले,सुहास मुंडे,बालासाहेब बोबडे,सुभाष साक्रुडकर,बाबासाहेब चुंचे यांच्यासह अनेक पदाधिकारी,कार्यकर्त्यांनी स्वाक्षऱ्या करून प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांच्या उमेदवारीची जोरदार मागणी केली आहे.

# चौसाळा जिल्हा परिषद गटात लोकनेते डॉ.बाबुरावजी जोगदंड साहेब यांच्या नावाची चर्चा

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील चौसाळा जिल्हा परिषद गटात लोकनेते डॉ. बाबुरावजी जोगदंड साहेब यांच्या नावाची जोरदार चर्चा असुन चौसाळा जिल्हा परिषद निवडणुक लढवावी म्हणून गावोगावी वाडी वस्तीवरील कार्यकर्त्यामध्ये जोरदार चर्चा रंगलेली दिसत आहे चौसाळा सर्कलचा प्रलंबित विकास करण्यासाठी योग्य व सक्षम उमेदवार असल्याची चर्चा दिसत आहे गोरगरीब लोकाना सढळ हाताने मदत करणारे प्रत्येक व्यक्तीच्या सुख दुखात सामील होणारे समाजकारणामध्ये सक्रिय सहभाग असलेले लोकनेते डॉ. बाबुरावजी जोगदंड साहेब यांच्या पाठिशी सर्वसामान्य जनतेची मोठी ताकत असुन अनेक गावातील विकासकामे मार्गी लावलेली आहेत त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासात्मक कार्यामुळे आणी सर्वसमावेशक व्यक्तिमत्वामुळे



लोकनेते डॉ. बाबुरावजी जोगदंड साहेब यांना चौसाळा जिल्हा परिषद गटात मतदारांची पसंती मिळत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे त्यांच्याकडे युवकांची लोकप्रियता कायम असल्याने त्यांनी चौसाळा जिल्हा परिषदेची निवडणुक लढवावी अशी मागणी सर्वसामान्य मतदारातुन होत आहे.

# महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटने तर्फे पदवीधर मतदार नोंदणी सुरू-जिल्हाध्यक्ष राहुल उंडाळे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी नगर पदवीधर मतदार संघाची निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे त्यानुसार मतदार नोंदणी सुरू आहे. त्यासाठी पदवी आधार फोटो व मतदान कार्ड नंबर इत्यादी माहिती लागते ही माहिती गोळा करून सर्वांचे फॉर्म भरून घ्यावेत. महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या सर्व शिलेदारांनी आपली तसेच परिवारातील व मित्र यांची नोंदणी करून घ्यावी व आपल्या हक्काचा आमदार विधानसभेत आपला जुनी पेन्शनचा प्रश्न सोडवण्यासाठी पाठवावा. आपला आवाज विधानसभेत पोहचवण्यासाठी हक्काचा आमदार पाहिजे. त्यामुळे मराठवाड्यातील सर्व पदवीधर मतदार यांची नोंदणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना बीड करत आहे. संपर्क राहुल उंडाळे जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना बीड ७५८८५९६०८८

# डॉ.संपदा मुंडे प्रकरणातील दोषींना कठोर शासन करून मुंडे कुटुंबाला न्याय द्या-आ.संदीप क्षीरसागर

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील कन्या डॉ.संपदा मुंडे यांच्या मृत्यू प्रकरणी जे दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.बीड जिल्ह्यातील मौजे कोठरबन येथील रहिवासी असलेल्या व फलटण येथे कार्यरत असणाऱ्या डॉ.संपदा मुंडे यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण महाराष्ट्रासह देशात खळबळ उडाली आहे.



आ.संदीप क्षीरसागर यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे की, शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांवर चालणाऱ्या प्रगतशील महाराष्ट्र राज्यामध्ये एक महिला डॉक्टर आत्महत्या करण्यासारखे पाऊल उचलते या सारखे दुर्दैव नाही.फलटण येथील पोलिस प्रशासन व आरोग्य प्रशासनाच्या त्रासाला कंटाळून स्व.डॉ.संपदा मुंडे यांनी आत्महत्या केली. यामुळे बीड जिल्ह्यात गंभीर पडसाद उमटले आहेत. ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. डॉ.संपदा मुंडे यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करून मुंडे कुटुंबाला न्याय देण्याची मागणी बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवारांची भेट घेऊन लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

# महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशनच्या कामांवरील आरोपावर अजित पवारांचे प्रत्युत्तर: राजकारण आणू नये, खिलाडूवृत्ती हवी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या सध्याच्या कार्यकारिणीच्या काही सदस्यांच्या कार्यपद्धतीवर शंका घेऊन केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि विधान परिषदेतील आमदार संदीप जोशी यांनी काल पत्रकार परिषदेत केलेले सर्व आरोप उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी फेटाळले असून त्यासंदर्भात स्पष्टीकरण दिले आहे.सन २०१३ पासून आपण महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचा अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली आहे.या कालावधीत खेळाचा दर्जा सुधारावा, खेळाडूंना उच्च दर्जाच्या सुविधा मिळाव्यात,म्हणून सर्वांना सोबत घेऊन आपण काम केले. आम्ही कार्यभार घेण्याआधी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्र राज्य सातव्या/ आठव्या स्थानावर होते.पण सलग मागील तीन राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्र आता प्रथम क्रमांकावर आहे. या यशाबद्दल महाराष्ट्राच्या खेळाडूंच्या पथकाचे आणि पदाधिकाऱ्यांचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीमध्ये सत्कारही झाले आहेत. प्रदीप गंधे,संजय शेटे, स्मिता शिरोळे, नामदेव शिरगावकर, धनंजय भोसले आधी सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि खेळाडूंच्या मेहनतीमुळे हे सगळं शक्य झालं.अस असताना केवळ निवडणुकांवर डोळा ठेऊन काही राजकीय व्यक्ती, संघटनेच्या एका विशिष्ट व्यक्तीला टार्गेट करण्यासाठी विविध आरोप राजकीय हेतूने करत आहेत, हे वागणे महाराष्ट्राच्या क्रीडा संस्कृतीला शोभणारे नाही. खेळाडूंची अशी कोणतीही तक्रार नसून,असे आरोप कोणत्याही खेळाडूने अद्याप केलेले नाहीत,असे अजित पवार स्पष्ट केले आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, १३ कोटीच्या भ्रष्टाचाराचा राजकीय आरोप ज्या पदाधिकाऱ्यावर केला आहे, तो पदाधिकारी खजिनदारही नाही. संघटनेकडे जो निधी येतो तो कोणा एका पदाधिकाऱ्याच्या हातामध्ये नसतो. संपूर्ण एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल त्याच्यावर देखरेख करत असते. तिच्या मान्यतेने तो खर्च होतो. या खर्चाचा हिशेब खजिनदार ठेवतात.संघटनेचे खजिनदार म्हणून धनंजय भोसले यांच्या अखत्यारीमध्ये त्याचे हिशोब होते. प्रत्येक राष्ट्रीय स्पर्धेमध्ये विविध खेळांसाठी महाराष्ट्राचे साधारणतः ८०० ते १००० खेळाडू सहभागी होतात. या सर्व सहभागी खेळाडूंना स्पर्धेच्या ठिकाणी जाण्या- येण्यासाठी विमान प्रवासाची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली. आवश्यक प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आली होती. महाराष्ट्र ऑलम्पिक संघटनेच्या रचनेनुसार संलग्न विविध खेळांच्या ३० संघटनांकडून देखील शासनाकडून आलेल्या निधीतील बराचसा निधी वापरला जातो आणि त्याचा हिशोब त्यांच्याकडून आल्यानंतर तो एकत्रित करून क्रीडा विभागाला तो सादर करण्यात येतो. त्या संघटनांनी हिशेब दिल्याशिवाय ऑलिंपिक असोसिएशनला शासनाला एकत्रित हिशेब देणे शक्य होत नाही. तेव्हा खऱ्या दोषी या हिशेब न देणाऱ्या संघटना असतात. अशा दोषी संघटनांमध्ये मोहोळ यांची संघटना व त्यांना पाठिंबा देणाऱ्या ५/६ संघटना आहेत.

संपादकीय

# भलतं दु:साहस

एखाद्या इंग्रजी चित्रपटाचं कथानक वाटावं असं ओलीसनाट्य गुरुवारी मुंबईतल्या पवईच्या आर ए स्टुडिओमध्ये घडलं. इंग्रजी चित्रपटांमध्ये अशा प्रकारच्या थराराचा शेवट जसा होतो, तसाच या अडीच तासांच्या नाट्याचा शेवटही झाला. इंग्रजी चित्रपटातल्या अपहरणकर्त्यांच्या मागण्या अशक्य वाटणाऱ्या, गुंतागुंतीच्या असतात. अतिरेक्यांकडून झालेल्या अपहरणानंतर टाकल्या जाणाऱ्या अटी राष्ट्रीय सुरक्षा किंवा राजकीय व्यवस्थेला ओलीस धरणाऱ्या असतात. गुरुवारच्या अपहरणकर्त्याने, रोहित हरळीकर उर्फ रोहित आर्यने ठेवलेल्या मागण्या त्या तुलनेत फारच सोप्या होत्या. त्यानेच प्रसारित केलेल्या व्हिडीओ क्लिपमध्ये त्याने त्या मांडल्या होत्या. 'माझं म्हणणं फक्त ऐकून घ्या. त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरं द्या किंवा माझ्याकडून उत्तरं घ्या' असं त्याचं मागणं होतं. 'मी कोणी अतिरेकी किंवा अटल गुन्हेगार नाही. ओलीस ठेवलेल्या मुलांना इजा करण्याची माझी इच्छा नाही. पण…' अशाप्रकारे हा अपहरणकर्ता स्वत:च सभ्य आणि समजुतीच्या भाषेत धमकावत होता. सुरुवातीला त्याचं म्हणणं काय आहे, हे कोणालाच माहीत नव्हतं. माजी शिक्षण मंत्री दीपक केसरकर आणि पोलीस उपायुक्त दत्तात्रय नलावडे या दोघांच्या संपर्कात आर्य होता आणि त्यांच्याकडे त्याने आपलं म्हणणं मांडलं होतं, असं नंतर स्पष्ट झालं. नलावडे यांनी त्याला तब्बल दोन तास संपर्कात ठेवलं होतं. त्याने ओलीस ठेवलेल्या मुलांच्या सुखरूप सुटकेसाठी राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या जवानांनाही सज्ज करण्यात आलं होतं. आर्य हा सरकारमध्ये अनेकांशी चांगला परिचित होता. प्रशासनातील शिक्षण विभागातील अनेक अधिकाऱ्यांकडे त्याची ये – जा होती. यापूर्वी त्याने लोकशाही मार्गाने मुंबई – पुण्यात आपला निषेध नोंदवला होता, आपल्याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. त्याच्यादृष्टीने सरकारकडून येणे असलेल्या रकमेबाबत गेल्या काही महिन्यांत त्याने सर्व स्तरावर प्रयत्न केले होते. थोडक्यात, 'गुन्हेगार' चांगलाच ओळखीचा होता. त्याचे वृद्ध आई–वडील, पत्नी आणि मुलगी पुण्यात राहतात. मध्यमवर्गीय पार्श्वभूमी असलेला, याआधी लघुपट निर्मिती केलेला, नवी कल्पना मांडून तत्कालीन सरकारसोबत राज्यभर मोठी मोहीम राबवलेला असा हा अपहरणकर्ता होता.तो किती घातक होता, किती धोकादायक होता? या प्रश्नांची उत्तरं आज 'जवळजवळ नाहीच' अशी दोन शब्दांत देता येतील. पण, जेव्हा १७ किशोरवयीन मुलं आणि दोन प्रौढ त्याच्या ताब्यात होते आणि तो सगळ्यांसह जाळून घेण्याची धमकी देत होता, तेव्हां हे उत्तर कोणाकडेच नव्हतं. कारण, तो नक्की काय करेल, याचा अंदाज कोणालाच नव्हता. आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी, सरकारी यंत्रणेवर आणि पोलिसांवर दबाव आणण्याच्या प्रयत्नात तो 'वेळ पडल्यास मी अगदी टोकाचं पाऊल उचलू शकतो' अशी धमकी देत होता. त्याने खरोखरच तसं काही केलं असतं, मुलांचा ओलीस असलेल्या प्रौढांचा जीव धोक्यात आला असता, तर मोठीच आफत आली असती. पोलीस; पर्यायाने सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं राहावं लागलं असतं. ऐन मुंबईत तसं काही घडलं असतं, तर त्याला जगभर प्रसिद्धी मिळाली असती. राज्याबरोबरच केंद्रातील सरकारच्या प्रतिमेचा प्रश्न पणाला लागला असता. मुलांच्या पालकांचा क्षोभ सांत्वनापलीकडचा असता. त्यामुळे, पोलिसांनी एका बाजूला त्याला चर्चेत गुंतवून, दुसऱ्या बाजूने स्टुडिओच्या हॉलमध्ये प्रवेश करण्याची योजना तयार केली. तसा प्रवेश मिळताच आर्यने समोरून काही आगळीक करण्याआधीच त्याला जेरबंद करण्याच्या उद्देशाने थेट गोळी चालवली. त्यात त्याचा मृत्यू झाला आणि सर्व ओलिसांची सुटका झाली, असं आतापर्यंत समोर आलेल्या घटनाक्रमावरून दिसतं. या संदर्भात आता अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. पोलिसांनी केलेल्या घाईबद्दल काहींनी न्यायालयात दाद मागण्याचा विचार बोलून दाखवला आहे. आर्यकडे केवळ एअरगन होती आणि तो सराईत गुन्हेगार नव्हता. विमनस्क मध्यमवयीन मध्यमवर्गीय होता, ही बाब त्यासाठी सांगितली जाते आहे. दोन्ही गोष्टी खऱ्याच आहेत. त्यामुळे, प्रकरण न्यायालयासमोर गेलंच, तर न्यायालय यातलं काय ग्राह्य धरतं आणि कशाबद्दल कोणाला दोषी धरतं ते आजपासून काही वर्षांनी समजेल!दरम्यान, या प्रकरणावरून एक गोष्ट प्रकर्षाने पुढे आली आहे. शासनाचे निर्णय आणि शासकीय कार्यपद्धती याबद्दल जनसामान्यांमध्ये कमालीचं अज्ञान आहे. एखाद्या मंत्र्याने किंवा अगदी मुख्यमंत्र्यांनीही एखादी गोष्ट जाहीर वा मान्य केली, त्याचे तोंडी आदेश दिले, तरी शासन दरबारी ती बाब लगेच संमत होत नसते. आपल्या प्रशासकीय रचनेतील 'चेक अँड बॅलन्स' तत्त्वानुसार प्रस्तावाची फाईल अनेक टेबलांवरून फिरावी लागते. यातल्या एखाद्या टेबलावर अनुस्वाराएवढी शंका अभिप्राय म्हणून पडली, तरी त्या फाईलला पुन्हा पहिल्यापासून आपला जीवनप्रवास सुरू करावा लागतो. असे गतिरोधक आपलं अस्तित्व दाखवून देत असतातच! किमान आमदार किंवा त्यावरच्या उच्चपदस्थाने नेटाने एखाद्या फाईलचा पाठपुरावा केला, तरच त्या फाईलचा प्रवास विनाव्यत्यय पूर्णत्वाला जातो. एखाद्या अभिनव कल्पनेबद्दल; ज्यात बांधकाम किंवा खरेदी नसेल, तर अशा फाईलचा प्रवास खूपच अडनिडा होतो. आर्य यांना याची नीट कल्पना नसावी किंवा सुरुवातीला मिळालेल्या सकारात्मक प्रोत्सहनाच्या जोरावर त्यांच्या मनात गैरविश्वास निर्माण झाला असावा. मौर्य यांनी जी कल्पना राबवली, त्यासाठी सुरुवातीला त्यांना काही रक्कम अदा केली गेल्याचं शिक्षण विभागाने आपल्या खुलाशात म्हटलं आहे. निधी मिळण्यासाठी ज्या गोष्टींची प्रतीपूर्ती करायला हवी असते, ती मौर्य यांनी केली नाही, असंही या खुलाशात नमूद करण्यात आलं आहे. याबाबत मौर्य यांचं काय म्हणणं होतं, ते आता कळू शकणार नाही. मुलांना ओलीस ठेवण्याचा आतताई मार्ग निवडण्याऐवजी त्याने थोडा संयम राखून आपल्या मागणीची तड लावली असती, तर ते त्याच्या आणि त्याच्या कुटुंबीयांच्याही हिताचं झालं असतं. अभिनेत्री रुचिता जाधव यांनी काल दिलेल्या माहितीनुसार, याच कथानकाचा सिनेमा त्याने केला असता, तर तोही त्याला काही ना काही लाभ देऊन गेला असता. हे भलतं दु:साहस शेवटी त्याच्याच जीवाशी आलं!

# गावांचा कायापालट अन् देशाचा विकास

भारत देशातील गावांमध्ये हस्त उद्योगांचा ऱ्हास झाल्याने गावांचा विकास खुंटला. त्यामुळे रोजगाराच्या निमित्ताने लोक गाव सोडून शहरात जाऊ लागले. तेव्हा शहरात जाणाऱ्या नागरिकांना थांबविण्यासाठी गावात पायाभूत सुविधा असणे आवश्यक आहेत. देशाचा विकास व्हायचा असेल, तर देशातील प्रत्येक गावाचा कायापालट व्हायला हवा. त्यासाठी शासकीय योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी झाल्यास देशाचा सर्वांगीण विकास व्हायला वेळ लागणार नाही. तेव्हा देशाच्या विकासासाठी गावांचा कायापालट होणे गरजेचे आहे. तरच आपला देश अधिकाधिक विकसित होईल. त्यासाठी आपल्या देशात राजकीय इच्छाशक्तीची खरी गरज आहे.आपला भारत देश आजही तिसऱ्या जगातील राष्ट्र म्हणून ओळखला जातो. कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशातील गावांच्या कायापालटवर अवलंबून असतो. गाव, पंचक्रोशी, तालुका, जिल्हा, राज्य आणि देश असा विकासाचा आलेख असतो. तेव्हा देशातील गावांचा कायापालट होणे गरजेचे असते. आपल्या देशात २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेश आहेत. सध्याची आकडेवारी उपलब्ध नसली तरी देशात सन २०११ च्या आकडेवारीनुसार ६,४९,४८१ गावे होती. त्यातील सुमारे ४१,००० गावे महाराष्ट्रात आहेत. म्हणजे आपल्या राज्यातील एकूण लोकसंख्येचा विचार केल्यास ५४.७८% लोक ग्रामीण भागात आजही राहतात ही वस्तुस्थिती आहे. खरे म्हणजे सन २००१ च्या शासकीय आकडेवारीनुसार आपल्या महाराष्ट्रात ४३,७२० गावे होती. राज्यातील सहा विभागांपैकी कोकण विभागामध्ये ३,१८३ गावे होती. ही आकडेवारी फारच जुनी असली तरी आपल्याला माहिती असणे गरजेचे आहे. त्यासाठी नियमित जनगणना होणे गरजेचे आहे. जनगणना केल्याने वस्तुस्थिती लक्षात येऊन विकासाची दिशा ठरविणे सोपे जाते. तेव्हा दरवर्षी वर्षाच्या शेवटी विकासकामे व राज्याची वस्तुस्थितीची आकडेवारी प्रकाशित करणे आवश्यक आहे. यातूनच प्रगती कशी साधू शकतो याचा विचारविनिमय होऊ शकतो. केवळ शंभर टक्के विकास निधी खर्च केला म्हणजे विकास झाला असे म्हणता



येणार नाही, तर गाव अथवा जिल्ह्यातील गरीबातील गरीब नागरिकाला त्याचा किती फायदा झाला हे जास्त महत्त्वाचे आहे. तेव्हा विकास निधी जरी वितरीत केला तरी तो योग्य कामासाठी केला आहे की नाही त्यावर सुजाण नागरीकांचे लक्ष असायला हवे. तसेच जो निधी वितरीत केलेला असेल त्याची नोंद गावातील ग्रामपंचायतीतील फलकावर ठळक अक्षरात लिहिण्यात यावी. म्हणजे आपल्या गावात किती शासकीय निधी आला त्याचा विनियोग कोणत्या कामासाठी खर्च करण्यात आला याची माहिती गावातील प्रत्येक नागरिकाला मिळेल. यातून खऱ्या अर्थाने गावात सामाजिक एकता निर्माण होण्याला मदत होते.

कोणत्याही देशाच्या विकासासाठी त्या देशातील गावांचा कायापालट अतिशय महत्त्वाचा असतो. त्यासाठी गावात पायाभूत सुविधा असणे आवश्यक आहे. आजही गावामध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा अभाव दिसून येतो. तेव्हा नागरिकांना स्वच्छ पाणी, आरोग्याच्या सुविधा, शौचालये, शिक्षण, स्वच्छता, लाईट व्यवस्था, रस्ते, दुकाने, लघु उद्योग, पारंपरिक उद्योग, सामूहिक शेती करणे, कुक्कुट पालन, वराह पालन व व्यावसायिक शिक्षण अशा सुविधा असणे गरजेचे आहे. म्हणजे नागरिक गाव सोडून शहरात जाणार नाहीत. महत्त्वाचे म्हणजे गावात विविध राजकीय पक्ष आपल्या पक्षाचे काम करीत असले तरी गावाच्या विकासासाठी राजकारण बाजूला करून एकत्रित काम केले पाहिजे. आपला देश हा शेतीप्रधान असल्याने शेतीचे उत्पन्न कसे वाढेल त्यापद्धतीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच स्थानिक महिलांचे नोंदणीकृत महिलामंडळ स्थापन करून महिला मंडळाच्या माध्यमातून विकासात्मक शासकीय विविध योजना राबविणे. त्यासाठी महिलांना योग्य प्रशिक्षण देण्यात यावे. केवळ आश्वासने देऊन गावाचा विकास होणार नाही तर आश्वासनांची पूर्तता केल्यास गावाचा विकास होईल. यासाठी गावातील नागरिकांच्या मनातील जातीचे उच्चाटन व्हायला हवे. शेतीला पूरक जोडधंदे निर्माण केले पाहिजेत. त्यामुळे शेतकरी राज्याला आर्थिक बळ मिळेल. निसर्गाचे संतुलन साधण्यासाठी प्रत्येक वर्षी पावसाळ्यात झाडे लावली पाहिजेत. त्याचप्रमाणे त्यांचे संगोपन करण्यात यावे. पावसाचे पाणी जमिनीत जिरवायला पाहिजे. त्यासाठी ठिकठिकाणी बांध घालायला हवे. यातूनच गावांचा कायापालट होतो. गावातील आजच्या परिस्थितीचा अभ्यास केल्यास काही गावांमध्ये आजही पायाभूत सुविधांचा अभाव दिसून येतो. थोडक्यात सांगायचे तर गावातील रावांमुळे गावातील वाड्या पायाभूत सुविधांपासून वंचित आहेत, मग सांगा गावांचा विकास होणार कसा? तेव्हा अंतर्गत वाद बाजूला सारून गावांचा कायापालट होणे गरजेचे आहे. त्यासाठी गावच्या ग्रामसेवकांनी आपली भूमिका नि:पक्षपातीपणे पार पाडली पाहिजे. कारण ग्रामसेवक हा त्या गावचा ग्रामविकास अधिकारी असून गावच्या प्रशासनात महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते.पुरामुळे शेतकरीराजा संकटात आहेत. तेव्हा गावातील शेतकरी राजाला सामूहिक शेती करण्यासाठी प्रोत्साहित करावे. तसेच त्यांना शेतीला पूरक असे जोडधंदे सुरू करून देण्यात यावेत. आजही शेतीचे नुकसान झाले तरी जोडधंद्यामुळे तेवढा आर्थिक आधार मिळू शकतो. त्यात सरकारी मदत मिळाल्याने शेतकरी राजा संकटाला सामोरा जाऊ शकतो. याचा परिणाम गावातील नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होऊन त्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत होईल. त्यासाठी देशातील प्रत्येक गावात पायाभूत सुविधा झाल्याच पाहिजेत तरच गावांचा कायापालट होऊन देशाचा सर्वांगीण विकास होईल

# केस गळती ते रक्तातील उच्च साखरेपर्यंत या हिरव्या भाज्या फायदेशीर

हिरव्या भाज्या लोहाचा उच्च स्रोत आहेत. याशिवाय यामध्ये व्हिटॅमिन सी देखील चांगल्या प्रमाणात आढळते. मोहरीच्या हिरव्या भाज्या आणि पालक, मेथी भरपूर खाल्ली जातात, परंतु याव्यतिरिक्त हिवाळ्याच्या हंगामात विविध प्रकारच्या हिरव्या भाज्या येतात. जसे की राजगिरा, बथुआ, अंबाडी, सोया किंवा डिलच्या हिरव्या भाज्या. या सर्व हिरव्या भाज्या बर्याच वेगवेगळ्या पोषक द्रव्यांनी समृद्ध असतात, म्हणून त्यांचे सेवन केवळ हिवाळ्याच्या हंगामात आपली प्रतिकारशक्ती वाढवत नाही, तर केस गळणे कमी करण्यास आणि रक्तातील उच्च साखर व्यवस्थापित करण्यास तसेच आरोग्याच्या अनेक समस्या दूर करण्यास देखील ते प्रभावी आहेत. या लेखात, आम्ही वेगवेगळ्या हिरव्या भाज्यांचे विविध आरोग्य फायदे जाणून घेऊ.हिरव्या भाज्यांचा फायदा शरीरासाठी देखील जास्त आहे, कारण बहुतेक मसाले त्यामध्ये फारच कमी वापरले जातात आणि तेलाचे प्रमाणही कमी होते. यामुळे, त्यांच्यात कॅलरी देखील कमी असते, जेणेकरून फिटनेस फ्रीक देखील कोणत्याही अपराधीपणाशिवाय त्यांचा आनंद घेऊ शकतात. न्यूट्रिशनिस्टनी राजगिरापासून मोहरीच्या हिरव्या भाज्यापर्यंतचे फायदे सूचीबद्ध केले आहेत.



**मेथी**

ज्यांना उच्च रक्तातील साखरेची समस्या आहे त्यांच्यासाठी मेथीच्या हिरव्या भाज्या खूप फायदेशीर आहेत, कारण ते रक्तातील साखर कमी करण्यास उपयुक्त आहे. या व्यतिरिक्त, हे आपल्या चयापचयला चालना देते, जे वजन कमी करण्यास देखील मदत करते. खरं तर, या हिरव्या भाज्या गॅलेक्टोमॅनन फायबरमध्ये समृद्ध असतात, म्हणून रक्तातील साखर नियमित करण्याबरोबरच मधुमेहावरील रामबाण उपाय संवेदनशीलता सुधारते.

**राजगिराचे फायदे**

जर तुम्हाला केस गळतीची समस्या असेल आणि हिवाळ्यात ते जास्त वाढत असेल तर राजगिराच्या हिरव्या भाज्या खाणे तुमच्यासाठी खूप फायदेशीर आहे. या व्यतिरिक्त, या हिरव्या भाज्या आपल्या उर्जेला देखील चालना देतील, ज्यामुळे काम करताना थकवा, आळस कमी होतो.

**बथुआमुळे पचनक्रिया सुधारते**

तणाच्या स्वरूपात वाढणार् या बथुआमध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी आणि कॅल्शिअम समृद्ध असतात. हे आपल्या आतड्याचे आरोग्य स्वच्छ करण्यास मदत करते, ज्यामुळे आपले पचन सुधारते. व्हिटॅमिन सी समृद्ध असल्याने ते आपल्या त्वचेसाठी देखील फायदेशीर आहे, कारण व्हिटॅमिन सी कोलेजेन सुधारते, ज्यामुळे त्वचा चमकते.

**मोहरीची हिरवी भाजी**

हिवाळ्यात लोकांना मोहरीच्या हिरव्या भाज्या खायला आवडतात आणि पंजाबी लोकांसाठी मोहरीच्या हिरव्या भाज्या ही एक जुनी खाद्य संस्कृती आहे. या हिरव्या भाज्यांमध्ये व्हिटॅमिन के सह अनेक शक्तिशाली अँटिऑक्सिडेंट्स असतात, जे जळजळ कमी करतात. हे वेदना कमी करते आणि या हिरव्या भाज्या यकृताला डिटॉक्सिफाई करण्यास उपयुक्त आहेत, परंतु ते कमी लोणी आणि कमी तेलाने बनविले पाहिजे.

**पालक**

पालक ही एक हिरव्या भाज्या आहे जी बर् याच प्रकारच्या हिरव्या भाज्यांसह बनविली जाते आणि मसूरसह देखील ती खूप चवदार असते. हे लोहाचा चांगला स्रोत आहे तसेच फोलेट आणि व्हिटॅमिन के समृद्ध आहे. हे आपल्या शरीरात हिमोग्लोबिन उत्पादनास मदत करते आणि नैसर्गिकरित्या आपली प्रतिकारशक्ती देखील वाढवते.

**हिरव्या भाज्या**

लोक सोया किंवा डिल हिरव्या भाज्या मेथी–पालकमध्ये मिसळून बनवतात जेणेकरून त्याची चव संतुलित राहील. या हिरव्या भाज्या कॅल्शियम तसेच फ्लेव्होनॉइड्समध्ये समृद्ध असतात. हे आपल्याला सूज येण्यापासून मुक्त होण्याचे हार्मोनल संतुलन राखण्यास मदत करते.

**अंबाडी**

हिवाळ्यात अंबाडी हिरव्या भाज्या देखील बाजारात येतात, ज्यांना गोंगुरा, पुलिचा, रोझेल इत्यादी म्हणून देखील ओळखले जाते. या हिरव्या भाज्या व्हिटॅमिन सी आणि लोहाचा उत्कृष्ट स्रोत आहेत. हे नैसर्गिकरित्या यकृत विषारी पदार्थ काढून टाकते आणि अशक्तपणा असलेल्यांसाठी देखील फायदेशीर आहे.

# लोहपुरुष, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल

सरदार वल्लभभाई पटेल यांना देशाच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात 'पोलादी पुरुष' म्हणून अत्यंत आदराने गौरविले गेले आहे... महात्मा गांधी यांच्या जवळचे सहकारी म्हणून सरदार पटेल स्वातंत्र्य चळवळीत अग्रेसर होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यपूर्ण होते. चाणक्याची मुत्सद्दी नीती त्यांच्याजवळ होती. आपल्या कामावर त्यांची प्रचंड निष्ठा होती. त्यांच्याकडे उत्तम संघटनकौशल्य होते. ते खंबीर प्रशासक होते. कणखर धोरणांचा अवलंब करून ५६५ संस्थानांचे विलीनीकरण त्यांनी करून एकसंध भारत उभा केला.....

सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील नाडियाड इथे ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला... आणंद हे त्यांचे गाव. जवळच असलेल्या करमसाद या गावी त्यांची वडिलार्जित शेती होती. झव्हेरीभाई हे त्यांचे वडील. या कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. वडिलांनी १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतला होता. त्यामुळे वल्लभभाई यांच्यावर घरीच राजकीय संस्कार झाले होते. त्यांनी आपले वकिलीचे शिक्षण पूर्ण केले आणि बोरसाड येथे वकिली सुरू केली. वल्लभभाई प्रत्येक केसचा बारकाईने अभ्यास करीत.....

एक अभ्यासू वकील म्हणून ते ओळखले जाऊ लागले... पुढे ते प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतून मार्ग काढून बॅरिस्टर झाले. (सन १९१३) त्यांनी आता अहमदाबाद येथे वकिली सुरू केली. त्यांचा युक्तिवाद सरस असे. उलटतपासणीच्या वेळी ते कसलेल्या साक्षीदाराचीही बोलती बंद करीत. विरोधक कोणते मुद्दे मांडतील याचा अभ्यास करून ते आपला बचाव तयार ठेवत असत. न्यायालयात ते अत्यंत निर्भीडपणे वागत असत. एक निष्णात वकील म्हणून त्यांचा अल्पावधीतच लौकिक झाला. वकिलीबरोबरच त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली. तिथून त्यांचा राजकारण प्रवेश झाला.....



१९१७ मध्ये खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला... त्यामुळे खरिपाचे पीक पूर्णपणे गेले. पुढे उंदरांचा सुळसुळाट तसंच अन्य कीटकांमुळे रब्बीचेही पीक गेले होते. २५ टक्क्यांपेक्षाही पीक उत्पादन कमी येईल, अशी परिस्थिती होती. या दुष्काळामुळे शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी, अशी शेतकऱ्यांची मागणी होती. १८ हजार सह्या असलेले एक निवेदन १५ नोव्हेंबर १९१७ रोजी सरकारला देण्यात आले. दयालाल येथील होमरूल लीगच्या सभासदांनी असेच निवेदन सरकारला दिले. परंतु याचा काही उपयोग झाला नाही. इंग्रज सरकारने शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश काढले आणि भांडीकुंडी जप्त करून सारावसुली सुरू केली. काही शेतकऱ्यांनी जमिनीचा काही हिस्सा विकून तर काहींनी व्याजाने रक्कम काढून शेतसारा भरला. या अन्यायात शेतकरी भरडला जाऊ लागला.....

महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसाऱ्याच्या वसुलीविरोधात खेडा जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांची सत्याग्रहाची चळवळ सुरू केली... या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपविले. सरदार पटेल यांनी ६०० गावांतील हजारो सत्याग्रही शेतकऱ्यांचे आंदोलन अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. यातूनच सरदार पटेल यांचे नेतृत्व भारतीय स्वातंत्र्य चळवळीत उदयास आले आणि महात्मा गांधींच्या सहवासात ते वाढले– फुलले आणि एक कणखर, धाडसी नेता म्हणून लौकिकप्राप्त झाले.....

महात्मा गांधी यांनी इंग्रज सरकारविरुद्ध सन १९२०–१९२२ या काळात भारतीय पातळीवर असहकार चळवळ सुरू केली... या सहकार चळवळीत लाखो लोक सामील झाले. या असहकार चळवळीत पं. मोतीलाल नेहरू, सी. आर. दास, पं. जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, राज गोपालचार्य आणि चिंतामणी केळकर यांनी आपल्या वकिलीचा त्याग केला. न्यायालयातील कामावर बहिष्कार टाकला. सन १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत सरदार पटेल यांनी भाग घेतला म्हणून त्यांना अटक करण्यात आली. त्यांना पाच महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली.....

महात्मा गांधींच्या खांद्याला खांदा लावून सरदार पटेल यांनी सन १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात भाग घेतला... इंग्रज सरकारने ९ ऑगस्ट १९४२ च्या पहाटेच गांधीजींसह सरदार वल्लभभाई पटेल, पं. नेहरू, आचार्य कृपलानी, मौलाना आझाद, गोविंद वल्लभपंत, असफअली या कॉंग्रेसच्या नेत्यांना अटक केली. या वेळी दुसरे महायुद्ध चालू होते. इंग्रज सरकार अडचणीत होते. अमेरिकेच्या मदतीमुळे दोस्त राष्ट्रांचा– इंग्लंड– फ्रान्सचा विजय झाला. तरीही या युद्धात इंग्लंडचे कंबरडे मोडले.....

भारताचा राज्यकारभार पाहण्याकरिता कॉंग्रेस, मुस्लीम लीग या अन्य पक्षांशी चर्चा करून इंग्रज सरकारने हंगामी सरकार सप्टेंबर १९४६ साली नियुक्त केले... या सरकारमध्ये सरदार वल्लभभाई पटेल गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत–पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. त्यानंतर हिंदू–मुस्लीम यांच्यात उसळलेल्या प्रचंड जातीय दंगलीमध्ये कणखर भूमिका घेऊन त्यांनी जातीय दंगली आटोक्यात आणण्याचे अथक प्रयत्न केले. पाकिस्तानच्या आगळिकीविरुद्ध जोरदार इशारा दिला. हिंदू आणि मुस्लीम यांच्याशी व्यवहारवादी भूमिकेतून संवाद साधून शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पटेल यांच्या बोलण्यात आणि कृतीत धर्मनिरपेक्षता होती. दरम्यान, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले.....

स्वतंत्र भारताचा राज्य कारभार पाहण्यासाठी पंतप्रधान पं. नेहरू यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ अधिकारावर आले... या मंत्रिमंडळात सरदार वल्लभभाई पटेल उपपंतप्रधान झाले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती व नभोवाणी खाते, संस्थानांचा प्रश्न व निर्वासितांचे पुनर्वसन इ. खात्यांची जबाबदारी होती. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थानांचे स्वतंत्र भारतात विलीनीकरण करून एकसंध भारत निर्माण केला. सरदार पटेल यांची ही मोठी ऐतिहासिक कामगिरी आहे. त्यांच्या या कामगिरीने सरदार पटेल खऱ्या अर्थाने पोलादी पुरुष आहेत हे इतिहास सिद्ध झाले.....

**डी.जी.पाटील.सर, ..निवृत्त मुख्याध्यापक, शहादा ता.शहादा, जि. नंदुरबार**

# यश ढाका खून प्रकरणातील संशयित आरोपी गणेश शिराळे याच्यावर गुन्हा नोंद करत अटक करा-वर्षाताई जगदाळे

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर धरणे आंदोलन

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

यश ढाका खून प्रकरणात पोलिसांनी अद्यापही संशय मास्तर माईंड गणेश शिराळे याला चौकशीसाठी ताब्यात घेतले नसून पोलिसांची भूमिका ही संशयास्पद वाटत असल्याने ढाका कुटुंबीयांच्या न्यायाच्या लढ्यात महाराष्ट्र निर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशाने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यरसमोर निर्माण सेनेकडून एक दिवसीय धरणे आंदोलन आयोजित केले होते. या धरणे आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांसह सामाजिक संघटनेच्या व नागरिकांचा सहभाग दिसला. यावेळी बोलताना महाराष्ट्र निर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले एक महिना होऊन गेला अद्यापही या प्रकरणाचा मास्टरमाइंड गणेश शिराळे याला अटक करण्यात आली नसून पोलिसांची भूमिका स्वयंशास्पद वाटत आहे. गणेश शिराळे याला अटक करा यासह हे प्रकरण एस आय टी कडे वर्ग करत प्रकरण पाच ट्रॅक कोर्ट मध्ये चालवण्यात यावे. तसेच यश ढाका हत्या प्रकरणात इतर आरोपींचाही सहभाग दिसून येत आहे सीसीटीव्हीच्या आधारे त्यांचीही चौकशी करावी, आधी मागण्या जिल्हा पोलीस प्रशासनाकडे धरणे आंदोलनाच्या माध्यमातून मनसेकडून मांडण्यात आल्या.२५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी आठ ते साडेआठ दरम्यान शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात किरकोळ वादावरून यश ढाका या २० वर्षीय तरुणाची हत्या करण्यात आली. यातील आरोपी सुरज काटे, सोमनाथ काटे,निखिल घोडके , कृष्णा सोनवणे, यांना अटक करण्यात आली असून सध्या सर्व आरोपी मध्यवर्ती कारागृहात आहेत . या घटनेचा सूत्रधार व मास्टरमाइंड सात गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात आरोपी असलेला व मोक्का अंतर्गत कारवाई झालेला संशयित आरोपी गणेश शिराळे अद्यापही फरार आहेत. या घटनेला एक महिन्याचा कालावधी लोटला आहे. गणेश शिराळे याला अजूनही पोलिसांनी आरोपी केले नसून आज पर्यंत चौकशीसाठी त्याला नोटीसही देण्यात आलेली नाही सदरील घटनेची तात्काळ गंभीर दखल गृहमंत्र्यांनी घ्यावी यासाठी हे धणे आंदोलन करण्यात आले असून या आंदोलनाच्या वेळी वर्षाताई जगदाळे यांच्यासह महिला जिल्हाध्यक्ष कुटे ताई, निर्भीड पतकार संघाच्या जिल्हाध्यक्षा किरण डोळस, जिल्हा सचिव आम्रपाली साबळे, आशाताई घुले, यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हाध्यक्ष अनुरथ वीर, पँथर संघटनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, माजी नगरसेवक रामसिंग टाक, एडवोकेट सत्यनारायण ढाका, आर्या प्रतिष्ठानचे स्वप्निल हातागळे, आकाश कडेरे, युवराज गोडसे, यांच्यासह ढाका कुटुंबीय, यश याचा मित्रपरिवार, यासह वाल्मीक समाजाचे बांधव तसेच बीड शहरातील सुजान नागरिकासह महाराष्ट्र निर्माण सेनेचे कार्यकर्ते या धरणे आंदोलनात सहभागी झाले होते.



### आठ दिवसात गणेश शिराळे याला हजर करणार जिल्हा पोलीस अधीक्षक कॉवत

**आंदोलन खर्चाची भेट घेत जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी कायद्याच्या सर्व बाजूचा अभ्यास करत या प्रकरणातील संशयित असलेला आरोपी गणेश शिराळे याला कायदेशीर नोटीस देत हजर करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. सदर पकरणाचा तपास पोलीस उपाधीक्षक पूजा पवार यांच्याकडे असून लवकरच सर्व तपास पूर्ण करत या प्रकरणातील कोणत्याही आरोपीला सोडण्यात येणार नसल्याचे नवनीत कावत यांनी म्हटले आहे, पीडित ढाका कुटुंबीयांसोबत पोलीस प्रशासन खंबीरपणे उभे आहे असेही यावेळी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी म्हटले आहे.**

# ..आणि ३५ वर्षांनंतर जुन्नरच्या पिपंरीत भरली विद्यार्थ्यांची शाळा

दैनिक वादळ वार्ता । **पुणे**

जुन्नर तालुक्यातील पिंपरी पेंढार येथील सदगुरु सीताराम महाराज विद्यालयातील १९९०-९१ च्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी तब्बल ३५ वर्षांनंतर एकत्र येत स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात साजरा केला. जुन्या आठवणींना उजाळा देत, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनासह हा आनंदाचा क्षण अनुभवला. प्रसंगी सदर स्नेहमेळाव्याचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे माजी प्राचार्य रोहिदास वेठेकर सर यांनी भूषवले. तर कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन, दीप प्रज्वलन आणि मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली. प्रसंगी शिक्षक श्री एकनाथ घाडगे, सरदार नवले, मंगला हिंगे, गणपत शिंदे, बाजीराव चौगुले, मुरलीधर औटी, अशोक मुथियान, शारदा मुरादे आणि ठिकेकर सर या शिक्षकांची प्रमुख उपस्थिती लाभली. हास्याचे लकेरी आणि ओलावलेल्या डोळ्यांच्या कडा ३५ वर्षांपूर्वी दहावीत असलेले विद्यार्थी आज डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, शेतकरी, व्यावसायिक अशा विविध क्षेत्रांत यशस्वी झालेले दिसत होते. सर्वांनीच आपल्या शालेय जीवनातील मंतरलेल्या दिवसांची अनुभूती पुन्हा घेतली. जुने किस्से,



शिक्षकांनी केलेली शिक्षा, छोट्याशा गोष्टींवरुन झालेले वाद आणि पुन्हा झालेली गट्टी अशा आठवणींना उजाळा देताना कधी हास्याच्या लकेरी तर कधी ओलावलेल्या डोळ्यांच्या कडा जमलेल्या सर्वांनाच पाहायला मिळाल्या. माजी विद्यार्थी राजेश वामन, सुनिल चौगुले, संजय कुटे, मनिषा कुटे, कृष्णा वेठेकर, सत्यवान पडवळ, अशोक डेरे, अनिता नवले आदींनी आई-वडिलांची पुण्याई आणि शिक्षकांचे ज्ञानदान यामुळेच आपण इथपर्यंत पोहोचल्याचे कृतज्ञतापूर्वक सांगितले. प्रणेश शिंगोटे यांनी शाळेत जाताना दररोज आठ किलोमीटर पायी प्रवास करून शिक्षण घेतल्याची आठवण सांगितली. मनीषा वाळुंज, नयना कुटे, सत्यभामा खोकले यांनी 'वाढविले ते आई-वडील आणि घडविले ते गुरुजन' यांच्यामुळेच आपण भरारी घेऊ शकलो असे मत व्यक्त केले. शिवाजी जोरी, बाळासाहेब वेठेकर, राघव पोटे, शिवाजी दुरगुडे यांनी ३५ वर्षांपूर्वी घेतलेल्या शिक्षणाची पुन्हा उजळणी झाल्याची भावना व्यक्त केली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर कुटे सर यांनी केले, तर प्रस्ताविक किसन यादव सर यांनी केले. उल्हास वेठेकर, कैलास पोटे आणि यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनाची धुरा सांभाळली.

# सोनारी येथे ज्येष्ठ नागरिक संघाचा नववा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**उरण ।** दैनिक वादळ वार्ता

जेष्ठ नागरिकांचे समस्या सोडविण्यासाठी सोनारी गावात स्थापन झालेल्या जेष्ठ नागरिक संघ तर्फे आजपर्यंत अनेक विविध उपक्रम कार्यक्रम राबविण्यात आले. जेष्ठ नागरिकांचे अनेक समस्या सोडविण्यात आल्याने सदर संस्थेचे नाव सर्वांनाच सुपरिचित झाले आहे.उरण तालुक्यातील सोनारी येथे मंगळवार दि. २८. १०. २०२५ रोजी ज्येष्ठ नागरिक संघाचा नववा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात प्रमुख पाहुण्याच्या हस्ते वर्धापन दिनाचा केक कापून साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे वादळवारा दैनिकाचे संस्थापक संपादक दा. चां. कडू (गुरुजी) उपस्थित होते. त्यांच्यासोबत रायगड भूषण प्रा. एल. बी. पाटील, उरण तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रमाकांत म्हात्रे, करळ गावचे डॉ. अविनाश तांडेल, न्हावा - शेवा पोलिस स्टेशन वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिपक सुर्वे यांचे प्रतिनिधी पीएसआय शांताराम लेंढे, सुजाता दिनेश कडू, ग्रा.पं. सदस्या व सोनारी गावचे अध्यक्ष अजय म्हात्रे इत्यादी उपस्थित होते.

वर्धापन दिनाच्या कार्यक्रमानिमित्त दा. चां. कडू(गुरुजी) यांनी ज्येष्ठांकडे असलेला



अनुभवाचा खजिना व त्यांनी केलेला जीवन संघर्ष यावर उपस्थित सदस्यांना मार्गदर्शन केले. त्याच बरोबर प्रा. एल. बी. पाटील सरांनी 'ज्येष्ठांचा समाजातील असणारा मान तरुणांनी राखला पाहिजे' यावर भाष्य केले तसेच ज्येष्ठांच्या जीवनावर एक सुरेख आगरी भाषेत कविता म्हटली तर रमाकांत म्हात्रे यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांची स्तुती केली. इतर पाहुण्यांनी वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देऊन ज्येष्ठांना मार्गदर्शन केले.तत्पूर्वी ज्येष्ठ सदस्य अशोक शंकर कडू यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संघटना काढून आज आपण नववा वर्धापन दिन साजरा करतो आहे. संघटना इथपर्यंत टिकवण्याचे व चालवण्याचे काम ज्यांनी केले ते संस्थापक दिनेश कडू खरंच कौस्तुकास पात्र आहेत. त्याच सोबत संघटनेसाठी काम करणाऱ्या इतर सदस्यांचा सुद्धा त्यांनी आपल्या मनोगतामध्ये आभार व्यक्त केले.या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला संघटनेचे उपाध्यक्ष रोहिदास. मो. पाटील, खजिनदार सुभाष.बा. कडू, सेक्रेटरी एन. आर. कडू, सदस्य प्रभाकर काळा कडू, के. के. कडू, केशव तांडेल, केशव. आ. कडू, रामकृष्ण तांडेल, हरिश्चंद्र लक्ष्मण कडू, भरत रसाळ, हरी सोमा तांडेल, प्रभाकर गो. तांडेल इत्यादींसह गावातील अनेक जेष्ठ नागरिक उपस्थित होते.पाहुण्यांच्या हस्ते दोन भेटवस्तू व दिवाळी मिठाई उपस्थितांना देण्यात आली.त्याचबरोबर कार्यक्रमाची सांगता अध्यक्ष नारायण कडू यांच्या मार्गदर्शनपर भाषणाने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे संस्थापक दिनेश कडू यांनी केले तर पाहुण्यांचे आभार मानण्याचे काम सदस्य के. के. कडू यांनी केले.जेष्ठ नागरिकांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या या संस्थेचे सर्वच स्तरातून कौतुक होत असून ग्रामस्थांनी, नागरिकांनी, विविध सामाजिक संस्थांनी या संस्थेला पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

# नवी मुंबई महापालिकेच्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे स्वाक्षरी मोहीम

## तुर्भे विभागातील जनतेचा आरडाओरडा-शौचालयांची दयनीय अवस्था!


दैनिक वादळ वार्ता
**नवी मुंबई । प्रतिनिधी**

इंदिरानगर, बगाडे कंपनी, गणपती पाडा, चुना भट्टी, बोनसरी आणि संपूर्ण तुर्भे विभागातील नागरीक मूलभूत सुविधांसाठी ओरडत आहेत. ज्या शौचालयांचा वापर लोक रोज करतात - तीच शौचालयं आज दुर्गंधी, घाण आणि अस्वच्छतेचं घर बनली आहेत.शौचालयाला मोठमोठे भेगा पडले आहेत, पाणी नाही, दिवे बंद, दारं तुटकी, जागोजागी घाण - या अवस्थेत आपल्या बहिणी-आईंना आणि लहान मुलांना किती त्रास सहन करावा लागतो, याची कल्पनाच करवत नाही. ही केवळ सोयीची बाब नाही... तर ही माणुसकीची लाज आहे! शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आम्ही वेळोवेळी महापालिकेला आणि संबंधित




अधिकाऱ्यांना या परिस्थितीबद्दल माहिती दिली. परंतु प्रत्येक वेळेस केवळ आश्वासनं - प्रत्यक्षात काम शून्य असते. जनतेचे आरोग्य धोक्यात आलं आहे, परिसरात अस्वच्छतेमुळे आजार पसरत आहेत, आणि तरीही प्रशासनाकडून दुर्लक्ष होतंय. हे अन्यायकारक आहे.आमची मागणी स्पष्ट आहे -महापालिकेने तातडीने तुर्भे विभागातील सर्व सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता, दुरुस्ती आणि पुनर्बांधणी करावी. हे केवळ राजकारणाचं नव्हे, तर जनतेच्या प्रतिष्ठेचं आणि आरोग्याचं प्रश्न आहे.जर प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष दिलं नाही -तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करू, आणि जोपर्यंत उपाय होत नाही तोपर्यंत लढा चालूच ठेवू.शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे नवी मुंबई उपजिल्हा प्रमुख, तथा शहरप्रमुख महेश कोटीवाले यांनी सांगितले याप्रसंगी उपशहरप्रमुख सिध्दाराम शिलवंत, विभागप्रमुख इस्माईल शेख, उपविभाग प्रमुख अन्वर खान, जितु गायकवाड, जयेश कांबळे,कार्तिक पिल्लई, उपशाखाप्रमुख इम्रान शेख, युवासेना शाखाधिकारी सुनिल स्वामी,महाराजा पिल्लई, भागवत हिवाळे, जमाल शेख, सज्जात कोतवाल, कैफ शेख, करण काळे, पवन रणदिवे, किशोर रणदिवे, राहुल ठाकूर, जेष्ठ शिवसैनिक आप्पासाहेब गुरव, तसेच प्रभागातील स्थानिक नागरिकांनी वयोवृद्ध व माता-भगिनी लहान मुले उपस्थित राहून स्वाक्षरी मोहिमेत सहभाग होऊन महापालिकेचा निषेध नोंदवला.

# नवीन पनवेलमध्ये दूषित पाणी पुरवठा,नागरिकांचे आरोग्य धोक्यात



दैनिक वादळ वार्ता
**पनवेल । प्रतिनिधी**

नविन पनवेल सेक्टर १७ पीएल ५ येथील १ ते २४ इमारतींमध्ये मागील काही दिवसांपासून दूषित पाण्याचा पुरवठा होत असून, त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सिडको प्रशासनाला याबाबत कल्पना देऊनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप केला जात आहे. दूषित पाणीपुरवठा थांबला नाही, तर सिडकोवर मोर्चा काढत जाब विचारला जाईल, असा इशारा येथील रहिवासीनी दिला आहे. नविन पनवेल या भागामध्ये सतत दूषित मातीमिश्रित पाणीपुरवठा होत आहे. आधीच कमी दाबाने पाणीपुरवठा होत असताना त्यातही दूषित, गढूळ पाण्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. नवीन पनवेल परिसरात अनेक ठिकाणी लहान मुलं व वयोवृद्ध नागरिक आजारी पडत आहेत. लहान मुलांमध्ये कॉलरा, डायरिया याची साथ पाहायला मिळत आहे. दूषित पाणीपुरवठा त्वरित थांबवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा येथील स्थानिक रहिवासींनी दिला आहे.

# नवीन पनवेल मध्ये पाणी प्रश्न पेटला,गेली अनेक वर्षापासून पाण्यासाठी वणवण

## पाणीटंचाई विरोधात महाविकास आघाडीचा सिडकोवर धडक पाणी बाणी मोर्चा

दैनिक वादळ वार्ता
**पनवेल । प्रतिनिधी**

सिडकोच्या दिशाहीन कारभारामुळे नवीन पनवेल मधील जनता भीषण पाणी टंचाईने हैराण आहे. या गंभीर समस्येवर तातडीने उपाय योजना करण्यात यावी आणि झोपी गेलेल्या प्रशासनाला व सत्ताधाऱ्यांना जागे करण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने नवीन पनवेल सिडको कार्यालयावर आज ( ३० ) धडक पाणी-बाणी मोर्चा काढण्यात आला. पोलिसाने मोर्चा सिडको कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर अडवीतच मोर्चेकऱ्यांनी पनवेल वावंजा रस्ता रोखून धरला. त्यामुळे सिडको आणि पोलिस प्रशासनाला मोर्चेकरांना सिडको कार्यालय आवारात घेण्याशिवाय पर्याय नव्हता.पनवेल शहरात भीषण पाणी टंचाई आहे. या भीषण पाणी टंचाई विरोधात नवीन पनवेल, कळंबोली, कामोठे, खारघर, तळोजा, येथे मोर्चे काढण्यात आले होते. भीषण पाणी समस्ये बाबत सिडको प्रशासनाला जाब विचारला होता. परंतु तरीही परिस्थितीत काहीच सुधारणा न झाल्याने आज महाविकास आघाडीने नवीन पनवेल सिडको विरोधात आक्रमक भूमिका घेत धडक पाणी बाणी मोर्चा काढला. सकाळी ११.०० वाजता शिवा कॉम्प्लेक्स, नविन पनवेल ते सिडको कार्यालय नविन पनवेल असे मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. सिडकोच्या मनमानी कारभारामुळे नवीन पनवेल मधील जनतेला गेली अनेक वर्षापासून भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. या समस्येसाठी सिडकोला जबाबदार धरत आजचा धडक मोर्चा काढण्यात आला होता.या मोर्चामध्ये माजी आमदार बाळाराम पाटील, काँग्रेसचे हरेश केणी , शिवसेनेचे शिरीष घरात, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे योगेश चिले, प्रकाश म्हात्रे, यतीन देशमुख, संजय ननावरे, शशिकला सिंग, आनंद भंडारी, विश्वजित करावा,.यांच्यासह अनेक महिला, पुरुष, जेष्ठ नागरिक या मोर्चात सहभागी झाले होते. यावेळी काही ठिकाणच्या पाईपलाईन लवकरच बदलल्या जाणार असल्याचे सिडकोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.मोर्चादरम्यान आंदोलकांनी सिडको प्रशासन आणि सत्ताधीशांवर निष्काळजीपणाचा आरोप करत बिल्डरांच्या घासत पाणी घालणाऱ्या नगरसेवकांचे करायचे काय, खाली डोके वर पाय , सिडको अधिकारी पाणी द्या नाहीतर खुर्च्या सोडा अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. आंदोलनकर्त्यांनी अधिकाऱ्यांना थेट धारेवर धरत पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करण्याची मागणी केली. नवीन पनवेलला गरजे प्रमाणे पाणी मिळत असताना जनतेची पाण्यासाठी वणवण का? विकासकाना बांधकाम करण्यासाठी पाणी मिळते पण येथील जनतेला पिण्यासाठी पाणी मिळत नाही. सत्ताधाऱ्यांनी फोन करताच त्यांना पाण्याचे टँकर मिळतात. तीच मागणी सर्वसामान्य नागरिकांनी केल्यास त्यांना एक दिवसांनी टँकर दिला जातो असा भेदभाव का?असा अनेक प्रश्नांनी सिडकोचे विरेंद्र पाटील आणि प्रफुल देवरे यांना मोर्चेकऱ्यांनी धारेवर धरले.

# 'एफआरपी' पेक्षाही जास्त भाव देणार खा.सोनवणेंनी ठणकावून सांगितले

## येडेश्वरी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आयुष्यात नवीन क्रांती यावी, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचवावे, असा हेतू डोळ्यासमोर ठेवून येडेश्वरी साखर कारखान्याची उभारणी केली. आजपर्यंत सर्वाधिक ऊसदर देण्याचे काम येडेश्वरी कारखान्याने केलेले असून यावर्षी देखील एफआरपीपेक्षा अधिकचा दर देऊ, असा शब्द खा.बजरंग सोनवणे यांनी उसउत्पादक शेतकऱ्यांना दिला.येडेश्वरी साखर कारखाना लि.युनिट नं.१, आनंदगाव (सा.), ता. केज येथील सन २०२५-२६ च्या १२ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साही वातावरणात संपन्न झाला. यावेळी खा.सोनवणे बोलत होते. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले, गेल्या ११ हंगामांपासून येडेश्वरी साखर कारखाना सातत्याने प्रगतीचा ध्यास घेत कार्यरत आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या परिश्रमामुळे आणि कारखान्याच्या कार्यक्षम व्यवस्थापनामुळे आज कारखान्याने उत्पादन, कार्यक्षमता आणि शेतकरी हितसंबंध या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळवले आहे. कारखान्याच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांना वेळेवर ऊस गाळप, योग्य दर, सेंद्रिय शेती व नवीन तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन केले. आगामी काळात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विकासासाठी साखर, इथेनॉल, वीज उत्पादन आणि उपउद्योग यांच्या माध्यमातून आणखी नवे प्रकल्प राबविण्याचा कारखान्याचा संकल्प आहे. आजवर येडेश्वरी कारखान्याने सर्व शेतकरी बांधवांचा ऊस वेळेत घेवून जाण्याचे काम केले आहे. यावर्षी देखील सर्व शेतकऱ्यांचा हा कारखाना घेवून जाईल. शेतकऱ्यांनी कोणतीही अडचण आल्यास कारखान्यावर यंत्रणेशी संपर्क करावा, असे आवाहनही खा.सोनवणे यांनी केले. या शुभारंभ प्रसंगी कारखान्याचे सर्व संचालक, ऊस उत्पादक शेतकरी, नेतेमंडळी, विभागप्रमुख, खातेप्रमुख, कर्मचारी, वाहतूक ठेकेदार, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### ऊस उत्पादकांना बोनसही देणार


**येडेश्वरी साखर कारखान्याने आजवर बीड जिल्ह्यात सर्वाधिक भाव देण्याचा प्रयत्न केलेला आहे. यावर्षीही आपण चांगला दर देणार आहोतच, पण या कारखान्यावर माझ्या शेतकऱ्यांचा मोठा विश्वास असून यावर्षी आपण ऊस उत्पादकांना बोनस देण्याचा देखील विचार करत आहोत. शिवाय यापुढे कायमस्वरूपी शेतकऱ्यांना बोनस दिला जाईल, असेही खा.सोनवणे म्हणाले.**

# राष्ट्र उभारणीचा मुख्य पाया शिक्षक; शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही प्राधान्य देऊ-सुषमा अंधारे

### बीड जिल्ह्यातील शिक्षकांनी घेतली शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांची भेट!

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्र उभारणीचा मुख्य पाया शिक्षक आहेत. ही बाब सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे. शिक्षकांना येणाऱ्या अडचणी तात्काळ दूर केल्या पाहिजे. परंतु दुर्दैवाची गोष्ट या राज्यामध्ये शिक्षकांना वेठीस धरण्याचे काम राज्य सरकारकडून केले जाते. शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही सदैव प्राधान्य देत आहोत. यापुढे शिक्षकांचे प्रश्न प्राधान्याने सोडवू असे आश्वासन शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी शिवसेना शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री लक्ष्मण बहिरवाळ आणि विनाअनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांच्याशी बोलताना दिले. या वेळी त्यांच्या समवेत शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास



गिराम आणि नितीन भैय्या धांडे आदी उपस्थित होते.

शिवसेना प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या अतिशय निकटवर्तीय आणि शिवसेनेच्या उपनेत्या मा. सुषमाताई अंधारे मॅडम ह्या आज गुरुवार दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी बीड शहरात आल्या होत्या. यावेळी बीड शहरातील शिक्षकांनी त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी शिक्षकांच्या विविध प्रश्नावर चर्चा केली. यावेळी बोलताना सुषमाताई अंधारे मॅडम म्हणाल्या की, शिक्षक हे समाजाचे योग्य दिशा दर्शक आहेत. ते मुलांचा सर्वांगीण विकास घडवून सुसंस्कारित पिढी निर्माण करतात. हीच पिढी देशाच्या विकासात महत्त्वाचा वाटा उचलते; म्हणूनच राष्ट्र उभारणीचा मुख्य पायाच शिक्षकाना मानले जात आहे. ही बाब शासनाने आणि समाजाने लक्षात घेतली पाहिजे. शिक्षकांना येणाऱ्या अडचणी तात्काळ दूर केल्या पाहिजे. परंतु दुर्दैवाची गोष्ट या राज्यामध्ये शिक्षकांना वेठीस धरण्याचे काम सरकारकडून केले जाते. शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही प्राधान्य देतो यापुढे ही प्राधान्य देऊ असे शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी शिक्षक सेना जिल्हाध्यक्ष श्री. लक्ष्मण बहिरवाळ आणि विनाअनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर यांच्याशी चर्चा करताना सांगितले. या वेळी श्री लक्ष्मण वाघमारे सर, श्री शिंदे सर, श्री. शिवप्रसाद सिरसाट सर यांच्यासह इतर शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# तरुण पिढी नैराश्याच्या गर्तेत-डॉ.जगदीश टेकाळे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत आहेत, विशेषतः तरुण पिढीमध्ये. नैराश्य ही आता एक गंभीर मानसिक आजार बनला आहे. पालकांनी आणि समाजाने वेळीच यावर लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. आजकाल अनेक तरुण आणि लहान वयाची मुले नैराश्याला बळी पडत आहेत. त्यांच्यावर असलेला शैक्षणिक ताण, सोशल मीडियाचा प्रभाव आणि नात्यांमधील गुंतागुंत ही याची काही प्रमुख कारणे आहेत.



**डिप्रेशनची कारण**

हेल्थ-शैक्षणिक आणि करिअरचा ताण :-आजच्या स्पर्धात्मक जगात मुलांवर चांगले गुण मिळवण्याचा, उत्तम कॉलेजमध्ये प्रवेश मिळवण्याचा आणि यशस्वी करिअर निवडण्याचा प्रचंड दबाव असतो.

सोशल मीडियाचा प्रभाव : सोशल मीडियावर दिसणारे परफेक्ट आयुष्य, इतरांशी सततची तुलना आणि सायबर बुलिंग यामुळे तरुणांना आपण कमी पडत आहोत असे वाटू लागते.

नात्यांमधील गुंतागुंत : प्रेमातील अपयश, मित्र मैत्रिणींशी होणारे वाद किंवा एकटेपणाची भावना हेदेखील डिप्रेशनचे एक कारण आहे. या काळात मुले संवेदनशील असतात.

हार्मोनल बदल : तारुण्याच्याकाळात शरीरात अनेक शारीरिक आणि हार्मोनल बदल होत असतात. हे बदल भावनिक अस्थिरता निर्माण करतात आणि नैराश्याचे कारण बनू शकतात.

लक्षणे पालकांनी वेळीच ओळखावी- मित्र-मैत्रिणींपासून दूर राहणे, आवडणाऱ्या गोष्टींमध्ये रस न वाटणे, जेवणाच्या आणि झोपण्याच्या सवयींमध्ये बदल. सतत उदास आणि निराश वाटणे, सतत चिडचिड करणे.असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

# वनहक्क दाव्यांच्या निवारणासाठी जिल्हा प्रशासनाचा सक्रिय उपक्रम-नंदुरबार जिल्ह्यात ३५६ प्रकरणांची सुनावणी

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

नंदुरबार जिल्ह्यातील वनहक्क प्रकरणांच्या निवारणासाठी अक्कलकुवा येथे तहसील कार्यालयात जिल्हास्तरीय वनहक्क समितीची बैठक व सुनावणी संपन्न झाली. सदर बैठक व सुनावणी जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला व सुनावणी दरम्यान सदस्य सचिव व प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार, उप वन संरक्षक सुहास चव्हाण, सहाय्यक उपवनसंरक्षक नंदुरबार संजय साळुंखे, तहसीलदार अक्कलकुवा विनायक घुमरे, जिल्हा समन्वयक हर्षल सोनार, प्रकाश गावित, रोशन चौरे, माकत्या वसावे, व्यवस्थापन व सहाय्यक अधिकारी दिपक पाडवी आदी उपस्थित होते. यावेळी एकूण ३५६ वनदावे हाताळण्यात आले.



बैठकी दरम्यान वनहक्क कायद्याअंतर्गत दावेदारांना त्यांचे हक्क वेळेवर मिळावेत, या उद्देशाने सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून प्रकरणांचे सखोल परीक्षण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. तसेचडॉ. सेठी यांनी वनहक्क हा केवळ जमीन मालकीचा प्रश्न नसून, तो आदिवासी व वनवासी समाजाचा सन्मान आणि अस्तित्वाशी जोडलेला आहे. प्रशासनाचे उद्दिष्ट म्हणजे प्रत्येक पात्र दावेदाराला न्याय मिळवून देणे असल्याचे स्पष्ट केले. या बैठकीत सर्व उपस्थित दावेदारांना त्यांच्या अर्जांबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले. संबंधित अधिकाऱ्यांना प्रकरणांच्या तपासणीचा अहवाल निर्धारित मुदतीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. या उपक्रमामुळे नंदुरबार जिल्ह्यातील वनहक्क प्रकरणांच्या निवारण प्रक्रियेला गती मिळून आदिवासी बांधवांच्या हक्क संरक्षणासाठी शासनाची बांधिलकी अधोरेखित झाली आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांचे आरक्षण जाहीर होताच उपळीत राजकीय चर्चेला उधाण

### ग्रामस्थांची मागणी-विनायक शेळके यांना द्यावी उपळी पंचायत समितीची उमेदवारी

दैनिक वादळ वार्ता
**वडवणी । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या जागांचे आरक्षण जाहीर होताच संपूर्ण तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. इच्छुक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपापले मतदारसंघ गाठण्यास सुरुवात केली असून उपळी परिसरात या घडामोडींना विशेष वेग आला आहे.

उपळी जिल्हा परिषद मतदारसंघ इतर मागासवर्गीय आरक्षणासाठी राखीव ठरला असून पंचायत समितीचा मतदारसंघ खुल्या प्रवर्गासाठी जाहीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर उपळी ग्रामस्थांमध्ये आता आमदार प्रकाश सोळंके यांनी उपळीचे उपसरपंच विनायक शेळके यांना उमेदवारी द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे.



उपळी हे सर्कलमधील महत्त्वाचे गाव असून आतापर्यंत या गावाला पंचायत समिती पातळीवर फारसे प्राधान्य मिळालेले नाही. परंतु या वेळी ग्रामस्थांनी शेळके यांच्यावर एकमताने विश्वास दाखवला आहे. विनायक शेळके हे सर्वसमावेशक कार्यशैलीसाठी ओळखले जातात. ते उच्चशिक्षित असून, सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन काम करणारे कार्यकर्ते आहेत. त्यांनी यापूर्वी पंचायत समितीची निवडणूकही लढवलेली असून या सर्कलमधील गावांमध्ये त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे.या सर्व बाबींचा विचार करता, शेळके हे पंचायत समिती निवडणुकीत सक्षम उमेदवार ठरू शकतात, असा विश्वास स्थानिक जनतेत व्यक्त होत आहे. आमदार प्रकाश सोळंके यांनी यावेळी उपळीच्या जनतेला न्याय देत विनायक शेळके यांना संधी द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, प्रकाश सोळंके यांना दीर्घकाळ पाठिंबा देणाऱ्या उपळी ग्रामस्थांमध्ये असा प्रश्न उपस्थित होत आहे की, पंचवीस वर्षांचा राजकीय दुष्काळ संपवून या वेळी उपळीला सन्मानाची उमेदवारी मिळणार का?

# दादासाहेब गवई यांच्या जीवनकार्याचे दर्शन घडविणारे स्मारक-मुख्यमंत्री

दैनिक वादळ वार्ता
**अमरावती । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पक्षाचे नेते केरळ आणि बिहारचे माजी राज्यपाल, रिपब्लिकन आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते दिवंगत रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या भव्य स्मारकाचे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले.भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या शुभहस्ते स्मारकाचे लोकार्पण झाले. या स्मारकात दादासाहेब गवई यांच्या जीवनकार्याचे दर्शन घडवणारे स्मृतीसभागृह, अत्याधुनिक २०० आसनी श्रोतगृह, स्मरणिका दालन, उपहारगृह आणि दृकश्राव्य कियॉस्कची सुविधा आहे. दर्शनी भागात १५ फूट उंचीचा ब्राँझ धातूचा पुतळा उभारण्यात आला आहे. त्यांच्या कार्याचा प्रवास १६ डिजिटल पोस्टर्स आणि दुर्मिळ छायाचित्रांद्वारे दाखवण्यात आला आहे.असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

या प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, लेडी गव्हर्नर कमलताई गवई यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.हा सोहळा अमरावती येथील मार्डी रस्त्यावर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मागे उभारण्यात आलेल्या दादासाहेब गवई स्मारक प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला. खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखडे आमदार रवी राणा, संजय खोडके, सुलभा खोडके, किरण सरनाईक, डॉ राजेंद्र गवई तसेच विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मनपा आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दादासाहेबांचं स्मारक उभं राहावं, ही सर्वांची इच्छा होती. आज ते सुंदरपणे साकार झालं आहे. मूर्तिकार आणि बांधकाम करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार. त्यांनी सांगितले की, या स्मारकात दादासाहेबांच्या निवडक भाषणांचा आस्वाद घेता येईल आणि यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.फडणवीसांनी आपल्या भाषणात दादासाहेबांशी असलेल्या जुन्या आठवणींना उजाळा देत म्हटले, त्या काळी सर्व आमदार रेल्वेने मुंबईला जात आणि सगळे दादासाहेबांच्या जेवणाच्या डब्याची वाट पाहत असत कारण तो नेहमीच खास असायचा.मुख्यमंत्र्यांनी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या व्यक्तिमत्त्वाचेही कौतुक केले. वकीली पासून सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश पदापर्यंत त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अजिबात बदल झाला नाही, असे त्यांनी नमूद केले. अजित पवार म्हणाले की, अमरावतीमध्ये काँग्रेस नगरात गवईंचे घर आहे त्या घराचे नाव कमलपुष्प आहे. म्हणजे काँग्रेस कमल हा काय योगायोग म्हणावा का यावर सभागृहात हशा पिकला दिवंगत गवई साहेबांची आज ९६ वी जयंती यानिमित्ताने स्मारक होत आहे पण या स्मारकाचे भूमिपूजन झाले तेव्हा फडणवीस मुख्यमंत्री होते आता ते तिसऱ्यांदा मुख्यमंत्री आहेत. काही वेळ मी उपमुख्यमंत्री होतो यावर पण सभागृहात हास्य उमटले.एकनाथ शिंदे यांनी गवईंच्या जयंती दिनाचा उल्लेख स्मृती दिन असा केला.दादासाहेब गवई या स्मृती निमीत्त लोकशाहीचे चार स्तंभ इथे अवतरलेत हीच खरी आंबेडकरी विचारांचा विजय आहे. सत्ता,क्षणभंगुर असते पण विचार कायम असतो. यावेळी प्रास्ताविक जिल्हा अधिकारी आशिष येडेवार यांनी केले ३५ कोटी खर्च झाल्याचे त्यांनी सांगितले.तर सरन्यायाधीश भूषण गवई यांनी उपस्थित मान्यवर आणि स्मारक उभारण्यात ज्याचा हातभार लाभला त्या सर्वाचे आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077